जा.क्र./मुजसंअका/प्रसिद्धी पत्रक/ /२०१९ दि. २६/११/२०१९

## प्रसिद्धी पत्रक

# भारतीय संविधान देशाला मिळालेली मोठी देणगी - मिलिंद म्हैसकर

म्हाडामध्ये संविधान दिनानिमित्त संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन

मुंबई, दि. २६ नोव्हेंबर, २०१९ : भारतीय संविधानामध्ये प्रदान करण्यात आलेल्या अधिकार व कर्तव्याची माहिती प्रत्येक भारतीयाला असणे गरजेचे आहे. भारतीय संविधान हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेली फार मोठी देणगी आहे, असे प्रतिपादन म्हाडाचे उपाध्यक्ष श्री. मिलिंद म्हैसकर यांनी आज केले.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) वांद्रे पूर्व येथील मुख्यालयात संविधान दिनानिमित्त संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. त्यावेळी श्री. म्हैसकर बोलत होते.

श्री. म्हैसकर म्हणाले की, भारतीय संविधान जगामध्ये सर्वश्रेष्ठ ठरले आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला जगण्याचा मूलभुत अधिकार मिळवून दिला आहे म्हणून प्रत्येकाने भारतीय संविधानाप्रती जागरुक असणे गरजेचे आहे. सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडविण्याचा व सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार

अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य-समानता प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने दि. २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी भारताची स्वतंत्र राज्य घटना अंगीकृत व अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण केली. या संविधानाविषयी माहिती जाणून घेणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. तसेच संविधानात नमूद केलेल्या कर्तव्यांचे पालन प्रत्येकाने करणे गरजेचे असल्याचे श्री. म्हैसकर यांनी सांगितले.

यावेळी मुख्य अभियंता-१ श्री. धीरजकुमार पंदिरकर, मुख्य अभियंता-२ श्री. संजय लाड, मुख्य अभियंता -३ श्री. सुनील जाधव, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. शहाजी पवार, सहमुख्य अधिकारी श्री. अविनाश गोटे, वित्त नियंत्रक श्री. विकास देसाई, विधी सल्लागार श्री. पी . बी. वीर, म्हाडाचे सचिव श्री. प्रसाद उकर्डे, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्रीमती वैशाली गडपाले, म्हाडा मागासवर्गीय कर्मचारी संघटनेचे प्रधान कार्यवाह श्री. एस. के. भंडारे आदींसह अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(वैशाली गडपाले)

मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा.


भारतीय
संविधान
दिनाच्या